नि.फौ.प्र. क्र. –३०३०१४७/२००२

शासन वि. सुनिल व इतर

**नि.क्र. ३७७१**



**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०४ मधुकर भय्याजी वखरे यांचा शपथेवर पुढील सरतपास (आरोपी क्र.३ साठी) – अभियोगपक्षा तर्फे विशेष सहा.सरकारी अभियोक्ता श्रीमती व्ही.सी.चावरिया यांच्या मार्फत –**

७. सदर गुन्हयाकामी पोलीसांनी माझे बयाण दोन वेळा नोंदविले होते. वर नमुद नोटशिटस् व फॅक्स (Fax) च्या प्रती या श्री गोडे यांच्या ताब्यात होत्या. दि.३०.०४.२००२ रोजी तपासी अधिकारी श्री बेले हे गुन्हयाच्या तपासाकामी आवश्यक दस्तऐवज जप्त करण्यासाठी बॅंकेमध्ये आले होते. त्याबाबतचा जप्तीपंचनामा करण्यासाठी त्यांनी मला व श्री आवारी यांना पंच म्हणून बोलावीले होते. तपासी अधिकारी श्री बेले यांनी बॅंकेमधून तपासकामी आवश्यक दस्तऐवज व वर नमुद मुळ नोटशिट्स, काही धनादेश इत्यादी कागदपत्रे माझ्यासमक्ष जप्त केली होती. आता साक्षीदारास दि.३०.०४.२००२ रोजीचा निशानी ११९५ वरील जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर अनु.क्र.२ वर त्यांची सही असल्याचे व अनु.क्र.१ वर श्री आवारी यांची सही असल्याचे साक्षीदार सांगत आहे. जी कागदपत्रे तपासी अधिकारी यांनी जप्त केली होती त्याची यादी सदर पंचनाम्यामध्ये आहे. सदर पंचनाम्यामधील मजकुर मला वाचून दाखविण्यात आला होता व तो बरोबर आहे. सदर जप्तीपंचनाम्यास **निशानी क्र.११९५/अ–३** देण्यात येते.

८. तसेच दि.०१.०५.२००२ रोजी तपासी अधिकारी श्री बेले हे गुन्हयाच्या तपासाकामी आवश्यक दस्तऐवज जप्त करण्यासाठी पुन्हा बॅंकेमध्ये आले होते. त्यांनी माझ्याकडून मुख्य अधिकारी, महाराष्ट्र राज्य सहकारी बॅंक मुंबई व होम ट्रेड लिमीटेड यांच्याकडून आलेल्या फॅक्सच्या पावत्या पंचनाम्याखाली जप्त केल्या होत्या. त्याबाबत पंचनाम्यावर माझी सही घेण्यात आली होती. आता साक्षीदारास दि.०१.०५.२००२ रोजीचा निशानी १३०५ वरील जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर त्यांची सही असल्याचे

साक्षीदार सांगत आहे. सदर पंचनाम्यावर दोन पंचांनी माझ्यासमक्ष सहया केल्या आहेत. सदर जप्तीपंचनाम्यास **निशानी क्र.१३०५/अ–३** देण्यात येते. आता साक्षीदारास निशानी क्र.१३०६ ते १३१० वरील फॅक्सच्या पावत्या व त्यावरील नोट्स दाखविण्यात आल्या. साक्षीदार सांगत आहे की, सदरच्या फॅक्सच्या पावत्या व त्यावरील नोट्स त्याच आहेत. सदर फॅक्स च्या पावत्या व त्यावरील नोट्स यांना **निशानी क्र.१३०६/अ–३ ते १३१०/अ–३** देण्यात येते.

सरतपास पुर्ण.

(Accused No.3 is present before the Court. His Ld. Advocate is absent. Adjournment application Exh.3776 is rejected. Hence, the cross-examination of said witness is closed vide Section 309(2)(c) of the Cr.P.C.)

समक्ष / श्रवणोत्तर स्वीकृत

Sd/-

(एम.व्ही.फडे)

दिनांक – २१.०१.२०२६

२रे अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,

नागपूर